# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## कुलसचिवाचे कार्यालय

**डॉ. आय.एस. मोहुर्ले**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५(महा.)
फोन:07132.216554, 223104 फॅक्स : 07132.22265
Email : gug.registrar@gmail.com
web: www.unigug.ac.in

क्रमांक/गो.वि./०५ /२०२० दिनांक : ०१/०१/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये

विषय :– अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम संदर्भ वर्षे २०१९–२० ची माहिती (aishe.nic.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत.

संदर्भ:–१) MHRD मार्फत सुरू असलेले AISHE portal (aishe.nic.in) च्या निर्देशावरून
२) मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र उशिसं/एआयएसएचई/२०१९–२० /१६५८९ दिनांक ३० डिसेंबर २०१९

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, ए.आय. एस.एच.ई वर्ष २०१९–२० ची माहिती (DCF व Teacher Information) दिनांक ०१/०१/२०२० पासुन सुरू झालेले असुन दिनांक ३१/०१/२०२० पर्यंत माहिती (DCF व Teacher Information) ऑनलाईन upload करावयाची आहे. माहीत अपलोड करतांना AISHE Portal (aishe.nic.in) वरिल तसेच पत्राशी संलग्नित नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

तसेच माहिती परीपुर्ण भरल्याबाबतचे प्राचार्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र एआयएसएचई नोडल ऑफिसर श्री. प्रमोद बोरकर (असिस्टंट प्रोग्रॉमर) संगणक विभाग यांचेकडे सादर करावे. विहीत वेळेत DCF upload न करणाऱ्या महाविद्यालयांवर संलग्नित पत्रातील मुद्दा क्र ६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन :- ०२०-२९७०७०९३

**महत्वाचे/प्रथम प्राध्यान्य**
**क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई /२०१९-२०/** 18589 **दिनांक - २३.१२.२०१९**
30 DEC 2019
**प्रति,**
**१) संचालक,**
१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई, ५ वा मजला, मुंबई म्युचुअल अनेक्स, बोरा बझार,गनबो स्ट्रीट, बॅलॉर्ड इस्टेट फोर्ट मुंबई.
३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, कुमटेकर रस्ता, पुणे.
**आणि**
**२) कुलसचिव,**
१) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.
२) उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव.
३) शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर.
४) सोलापूर विदयापीठ, सोलापूर
५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.
६) संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती.
७) कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक जि.नागपूर
८) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
९) मुंबई विदयापीठ, मुंबई.
१०) सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे.
११) गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली.
१२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
१३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
१४) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ,मुंबई.
१५) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ,नागपूर.
१६) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ, औरंगाबाद.
१७) गोखले अर्थशास्त्र संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
१८) टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे
१९) डेक्कन अभिमत विदयापीठ, येरवडा, पुणे
२०) भारती विदयापीठ, पुणे, भारती भवन, लालबहादूर शास्त्री रस्ता, पुणे
२१) सिंबायोसिस विश्वविदयालय, सेनापती बापट रोड, पुणे.
२२) डॉ.विश्वनाथ कराड एम.आय.टी.वर्ल्ड पीस युनिर्व्हसिटी,पुणे.
२३) संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर.
२४) सिंबायोसिस स्कील व ओपन विद्यापीठ,पुणे -मुंबई एक्सप्रेस,किवळे, पुणे-४१२१०१.
२५) डी.वाय.पाटील,इंटरनॅशनल युनिर्व्हसिटी,सेक्टर २९,प्राधीकरण आकुर्डी,पुणे-४४.
**२६) फलेम युनिर्व्हसिटी, लवळे (Flame University) मुळशी,पुणे-४२.**
२७) स्पायसर ॲडवेन्टीस्ट युनिर्व्हसिटी ( Spicer Adventist University)औंध रोड,गणेशखिंड,पोस्ट,पुणे-४११००७.
२८) छत्रपती शिवाजी महाराज युनिर्व्हसिटी ,पनवेल,मुंबई-४१०२०६.
२९) विश्वकर्मा विद्यापीठ,पुणे.
३०) संदिप विदयापीठ, त्रयंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२२१३.
३१) अंजिक्य डी.वाय.पाटील,लोहगांव,पुणे.
३२) एमआयटी आर्ट, डिझाईन ॲन्ड टेक्नॉलॉजी युनिर्व्हसिटी, लोणी कॅम्पस, लोणी काळभोर, पुणे
३३) अमिटी युनिर्व्हसिटी, (Amity University Mumbai) मुंबई-पुणे एक्सप्रेस,भाटन,सोमाटणे,पनवेल मुंबई-४१०२०६.
**३४)जी.एच.रायासोनी विद्यापीठ, अमरावती.**

३५) डी.एस.के.विद्यापीठ,पुणे.
३६) महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविदयालय, वर्धा
३७) इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, Nathalal Parekh Marg, Matunga, Mumbai
३८) टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, देवनार, मुंबई
३९) कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, क-हाड जि.सातारा
४०) महाराष्ट्र पशु व मत्स्य संवर्धन विदयापीठ, नागपूर.
४१) आरोग्य विदयापीठ, नाशिक
४२) डॉ.पंजाबराव देशमुख कषी विदयापीठ, अकोला
४३) डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विदयापीठ, दापोली जिल्हा रत्नागिरी
४४) वसंतराव नाईक मराठवाडा कषी विदयापीठ, परभणी
४५) महात्मा फुले कषी विदयापीठ, राहुरी जि.अहमदनगर
४६) प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, प्रवरानगर, लोणी, जि.अहमदनगर
४७) डी.वाय.पाटील शैक्षणिक संस्था, कोल्हापूर
४८) एम.जी.एम.इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ सायन्सेस, नवी मुबई
४९) दत्ता मेघे इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नागपूर
५०) डॉ.डी.वाय.पाटील विदयापीठ, पिंपरी, पुणे
५१) डॉ. होमी भाभा नॅशनल इन्स्टिटयूट , मुंबई
५२) नर्सी मोनजे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई
५३) पदमश्री डी.वाय.पाटील विदयापीठ, नवी मुंबई
५४) टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, तुर्भे,मुंबई.
५५) सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, मुंबई
५६) डीफेन्स इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, पुणे.
५७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिर्व्हसिटी, लोणेरे, जि.रायगड
५८) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे.
५९) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पवई, मंुबई
६०) इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई, Gen A.K.Vaidya Marg Santosh Nagar Film City Road Goregaon (East) Mumbai.
६१) इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन सायन्स, देवनार, मंुबई.
६२) सर विश्वेश्वरैय्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर
६३) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बीएसएनएल रिजनल टेलिकॉम ट्रेनिंग सेंटर, सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६.
६४) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, तळेगांव-चाकण रस्ता, संदुंबरे, पुणे-४१२१०९.
६५) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, नागपूर-४४०००६.
६६) नॅशनल [illegible] कृषी विद्यापीठ-[illegible]. ६७) ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स

**विषय** - अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१९-२० , नागपूर
**डिसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबत.**

**संदर्भ** - मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे दि.२३.१२.२०१९ चे ई-मेल च्या अनुषंगाने .

**मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांच्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१९-२० डिसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबतची वेबलिंक दिनांक १.१.२०२० पासून चालू होणार असून सर्व विदयापीठांनी आणि संलग्नित महाविदयालयांनी माहिती नोंदणीचे डिसीएफ दिनांक ३१.०१.२०२० पर्यत अपलोड करावयाचे आहे.**

२. या अनुषंगाने दरवर्षी प्रमाणे राज्यातील सर्व प्रकारची विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयांनी आपल्या संस्थेच्या सन २०१९-२० या वर्षाच्या माहिती नोंदणीचे डिसीएफ-I, II, III सर्वेक्षणाची वेबसाईट www.aishe.gov.in वर अपलोड करावेत. विदयापीठांनी आपल्या विदयापीठातील नियुक्त करण्यात आलेल्या एआयएसएचई नोडल अधिका-यांकडुन आपल्या विदयापीठाचे माहिती नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड करावेत. विदयापीठांशी संलग्नित असलेल्या महाविदयालयांचे माहिती नोंदणी चे डिसीएफ अपलोड करणेबाबत विदयापीठस्तरावरुन स्वतंत्र पत्र, ई-मेल, दूरध्वनीव्दारे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे आणि डिसीएफ अपलोड करुन घ्यावेत.

३. राज्यातील संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई आणि संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे हे सर्वेक्षणाकरीता राज्यातील सेक्टरल नोडल अधिकारी आहेत. सदरील कार्यालय प्रमुखांनी आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या आणि पदविका अभ्यासक्रम प्रदान करणा-या अनुक्रमे तंत्रशिक्षण, नर्सिंग (शुश्रुषा) आणि अध्यापक (डि.एड) महाविदयालांतील प्राचार्यांशी तसेच आपल्या संचालनालयाच्या जिल्हा/प्रादेशिक स्तरावरील अधिका-यांशी पत्र, ईमेल, दूरध्वनीव्दारे संपर्क साधून मानव संसाधन मंत्रालयाचा सन २०१९-२० चा सर्वेक्षणाचा कार्यक्रम चालू झाल्याचे कळवावे आणि त्यांचेकडुन डिसीएफ अपलोड करुन घ्यावेत.

कृमाप

४. राज्यातील सेक्टरल नोडल अधिका-यांनी आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या महाविद्यालयाकरीता आणि विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांकरीता विभाग/जिल्हास्तरावर डिसीएफच्या माहिती **नोंदणी व अपलोड करण्याबाबत मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित कराव्यात व कार्यशाळेच्या तारखांचे नियोजन दि.१०.१.२०२१ पर्यंत सांख्यिकी शाखेच्या stat.dhepune@nic.in या ई-मेल आयडीवर संचालनालयास कळवावे.**

**५. वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांकरीता -**

सन २०१९-२० हया वर्षात सेक्टरल नोडल अधिका-यांकडे नव्याने नोंदणी झालेल्या आणि विदयापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या अथवा अदयाप एआयएसएचई वेबपोर्टलवर नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांची नोंद वेबपोर्टलवर करुन घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित महाविदयालयांशी पत्र व दूरध्वनीव्दारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात यावी. तसेच **सन २०१९-२० या वर्षात बंद असलेली अथवा असंलग्नित असलेली (De-affiliate) महाविदयालयांची/संस्थांची (Institute list) यादी संचालनालयास महाविदयालयांच्या/संस्थांच्या बंद झालेल्या प्रमाणपत्रासह (closer certificate) सादर करण्यात यावी.** सदरील महाविदयालये सिस्टिममधून डिॲफिलिट करण्यात येतील ज्यामुळे संबंधित महाविदयालयांकडे डिसीएफ अपलोड करण्याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**६. महाविदयालयांची माहिती अपलोड झालेबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत -**

सर्व महाविदयालयांकडुन माहिती नोंदणीचे डिसीएफ विहित मुदतीत वेबपोर्टलवर अपलोड करुन घेण्याच्या दृष्टीने सेक्टरल नोडल कार्यालय/विदयापीठामार्फत महाविदयालयांवर संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. **या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे एआयएसएचई वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविदयालयांचीच कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल व अनुषंगिक कामे) सेक्टरल नोडल कार्यालय आणि विदयापीठातील इतर शाखा/विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत.** याबाबत संबधित शाखेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

महाविदयालयांनी सन २०१९-२० च्या अचूक माहिती नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड केल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांकडुन घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत उच्च शिक्षण संचालनालयास वरील ई-मेलव्दारे सादर करण्यात यावी. महाविदयालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सेक्टरल नोडल कार्यालय अथवा विदयापीठाच्या एआयएसएचई नोडल अधिका-यांनी संबंधित महाविदयालयास सन २०१९-२० च्या डिसीएफ अपलोडिंगचे काम पूर्ण केल्याबाबतचे आणि महाविदयालयाची सेक्टरल नोडल कार्यालय/ विदयापीठातील इतर शाखा/विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र दयावे. ज्यामुळे सेक्टरल नोडल कार्यालय/विदयापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविदयालयांचा समावेश सर्वेक्षणात होऊन त्यांचे डिसीएफ अपलोड होतील.

**सेक्टरल नोडल कार्यालयाच्या/विदयापीठाच्या एआयएसएचई नोडल अधिका-यांचे डिसीएफ अपलोड झाल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाने कार्यालयाच्या/विदयापीठाच्या शाखेस सादर केल्यानंतर कार्यालयातील/विदयापीठातील शाखा/विभाग यांचेकडुन संबंधित महाविदयालयाची अनुषंगिक कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत.** ज्यामुळे महाविदयालयांकडुन करण्यात येणा-या डिसीएफ अपलोडिंगच्या कामावर प्रभावी सनियंत्रण राखणे शक्य होईल. वरील दोन्ही प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

७. राज्यातील सन २०१९-२० मध्ये नव्याने अस्तित्वात आलेल्या अथवा प्रथमच डिसीएफ अपलोड करणा-या फलेम युनिर्व्हसिटी लवळे, मुळशी पुणे, जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती या विदयापीठांनी उच्च शिक्षण संचालनालयाशी /मानव संसाधन विकास मंत्रालयाशी त्वरीत संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करुन घ्यावी तसेच सर्वेक्षणाच्या कामाबाबत प्रत्यक्ष संचालनालयाशी संपर्क साधावा आणि माहिती घेऊन डिसीएफ अपलोड करावेत.

**(डॉ.धनराज माने)**
**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**(महाविदयालयांकडुन माहिती भरल्याबाबत प्राप्त करावयाचे प्रमाणपत्र)**

## -: <u>प्रमाणपत्र</u> :-

प्रमाणित करण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई) सन २०१९-२० या वेबपोर्टलवर ---------------------------------------------------- --------------------- हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती अपलोड केली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

(स्वाक्षरी)

दिनांक - प्राचार्य

महाविदयालयाचे नांव व सील

ठिकाण -

---

**(सेक्टरल नोडल कार्यालय/ विदयापीठाकडुन महाविदयालयांना दयावयाचे ना- हरकत प्रमाणपत्र )**

## -: <u>प्रमाणपत्र</u> :-

प्रमाणित करण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई) सन २०१९-२० या वेबपोर्टलवर ---------------------------------------------------- -------------------- हया महाविदयालयाचे माहिती नोंदणीचे डिसीएफ अपलोड करण्यात आले आहेत. सबब सदरील महाविदयालयाची आवश्यक ती कामे सेक्टरल नोडल कार्यालयाच्या/विदयापीठाच्या संबंधित शाखेकडुन पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

दिनांक -

सेक्टरल नोडल कार्यालय/ विदयापीठ नोडल अधिकारी

एआयएसएचई प्रणालीकरीता

ठिकाण

(सेक्टरल नोडल कार्यालय/विदयापीठाचे नांव)